दिनांक : १२.०४.२०२२

# बेन्यू ट्रनिंग इन्स्ट्रिटयूट
## वार्षिक अहवाल २०२१- २०२२

यावर्षी कोवीड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या प्रार्दुभावामुळे ऑनलाइन शाळा सुरू होती. अगदी शेवटी विदयार्थ्यांना परीक्षेसाठी शाळेत बोलावले गेले.

या वर्षी प्रिझम चा एक खंबिर आधारस्तंभ कोसळला. संस्थापक विश्वस्त मा.श्री य.गं.पटवर्धन यांचे अल्पशा आजाराने देहावसान झाले. संस्थेच्या अुभारणीमध्ये त्यांचा मोलाचा सहभाग होता.

नेहमीचे उपक्रम

- तिन्ही शाळांची सेशन्स दरवर्षी प्रमाणे घेण्यात आली. तिन्ही शाळांचे मिळून २२ विद्यार्थ्यांचे सेशन्स घेण्यात आले. पूर्ण वर्षभर वेगवेगळया आर्ट ॲन्ड क्राफ्ट ॲक्टिव्हिटी Fine motor skills, Attention वर भर देवून घेण्यात आल्या. काही ॲक्टिव्हिटीसाठी विद्यार्थ्यांना पालकांची मदत घ्यावी लागली.तसेच मुलांची चित्रे कागदाच्या मधोमध आणि मोठी यावी यासाठी कागदाची घडी घालुन सेंटर काढुन घेण्याची त्यांना सवय लावली याचा फायदा झाला.
- यावर्षी फिनिक्स मधील दोन आणि एम.ओ.व्हि.एस च्या सहा विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन वाचन प्रकल्प राबविण्यात आला. त्यामध्ये एकूण जुलै ते मार्च याकालावधी मध्ये ३ गुपची प्रत्येकी एकूण ३२ सेशन्स घेतली गेली.

  सेशन्स मध्ये घेण्यात येणा-या ॲक्टिव्हीटीचे फोटो, व्हिडीओ whatsApp व्दारे शाळेत पाठविण्यात येत होते.

सभा

पुढील वर्षी टिचर्सना देण्यासाठी स्वयंमूल्यमापनाचे प्रश्न तयार केले. त्याबद्दल संचालिका व दोन्ही मुख्याध्यापिकांबरोबर चर्चा करण्यात आली.

- तिन्ही शाळेतील विद्यार्थ्यांच्या ॲक्टिव्हिटी, कार्यक्रम नियोजन याचे नियोजन केले.
- शैक्षणिक वर्ष २०२२ -२०२३ मध्ये अंदाजे विद्यार्थी संख्या, त्यासाठी लागणारे वर्ग, ॲक्टिव्हिटी कशा व कोणत्या घ्याव्यात यावर संचालिका व सर्व मुख्याध्यापिकांबरोबर चर्चा करण्यात आली.
- बेन्यू ट्रेनिंग संदर्भात चर्चा करण्यात आली.
- यावर्षीपासुन पल्लवी आणि संध्या बरोबर होणा-या मीटींग च्या नोंदी ठेवत आहे ज्यामुळे कामांचा आढावा घेणे सोपे होत आहे.

इनहाउस ट्रेनिंग

- या वर्षी १५ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले तसेच त्यांचे मुल्यमापनही करण्यात आले.
- बेन्यू च्या पुढील वर्षीच्या २०२२-२३ नियोजनाला सुरूवात करण्यात आली आहे.
- पालकांना, शिक्षकांना मदत होईल यासाठी विविध नोटस् व चेकलिस्ट तयार करणे चालू आहे.
- बेन्यू तर्फे घेतल्या जाणा-या पुढील वर्षीच्या शिक्षकांच्या ट्रेनिंगसंदर्भात कामांची आखणी करण्यात आली.

कार्यशाळा

- हर्षा मुळे यांनी मुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका व ऑफीस स्टाफ यांच्यासाठी 'नियोजन' या विषयावर प्रशिक्षण घेतले .
- शिक्षकांसाठी ३ कार्यशाळा घेण्यात आल्या . यामधे नृत्योपचार, संगितोपचार, कथाकथन या विषयांचा समावेश होता . सगळयांना कार्यशाळा अुपयोगी वाटल्या .
- सेवासहयोगच्या चेतना केंद्राच्या पालकांसाठी कार्यशाळा घेतली .
- मीना शेंडकर यांच्यासाठी अध्ययन अक्षमता याविषयावर हर्षा मुळे यांनी कार्यशाळा घेतली .
- पालकांसाठी लेव्हलप्रमाणे फाइन मोटर स्कील्स,. बहुविध बुध्दीमत्ता या विषयांवर कार्यशाळा घेतल्या .

कार्यक्रम

- प्रिझमच्या सर्व मुख्याध्यापिका व स्टाफ १५ ऑगस्ट व २६ जानेवारी रोजी झेंडावंदनासाठी संस्थेत उपस्थित होत्या .
- २६ जानेवारीला ऑनलाइन शिक्षण 'धरले तर चावते' या विषयावरील तमोहरचे प्रकाशन करण्यात आले . अंक व कार्यक्रम छान झाला .
- तिन्ही शाळांची ऑनलाइन पालखी, दिवाळी, स्नेहसंमेलने छान साजरी करण्यात आली .
- कै . कमलाबाई गोडबोले आंतरशालेय पाठांतर स्पर्धा सर्वसामान्य विद्यार्थी व विशेष विद्यार्थी अशा दोन्हीं गटांसाठी ऑनलाईन आयोजित करण्यात आल्या होत्या . विजेत्या स्पर्धेकांना संस्थेत बोलावून पारितोषिके देण्यात आली .

ISO

- दि . २५ .0८ . २0२१ रोजी Internal Audit झाले .
- दि . १९ .११ . २0२१ रोजी Surveillance Audit झाले .
- दि . २३ .0२ . २0२२ रोजी Internal Audit झाले .

विद्या भागवत
मुख्याध्यापिका
वेन्यू प्रशिक्षण संस्था